# प्रेसनोट

## खंडणी विरोधी पथकाकडून हिंजवडी भागात एक पिस्टल व एक काडतुस जप्त

दि. ०७/०७/२०१७ रोजी खंडणी विरोधी पथकाचे अधिकारी व कर्मचारी हिंजवडी पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना खंडणी विरोधी पथकातील पोलीस नाईक सचिन अहिवळे यांना एक इसम एक पिस्टल घेवुन कोयतेवस्ती, पुणे मुंबई हायवेलगत उभा असल्याची माहिती मिळाल्याने खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव यांचे दिमतीत खंडणी विरोधी पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक विठ्ठल शेलार व स्टाफने सापळा रचुन इसम नामे कुणाल अंकुश भेगडे वय २३ रा. भेगडेवाडा, शेलारवाडी ता. मावळ जि. पुणे याला पकडून त्याचेकडून एक पिस्टल व एक जिवंत काडतूस असे किं.रुपये २०,१००/- चे अग्निशस्त्र जप्त करण्यात आले असून सदरबाबत हिंजवडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## खडक पोलीस स्टेशन हद्दीतील अपहरण करुन, धमकावून खंडणीची मागणी करणा-या सराईत आरोपीस अटक

खडक पोलीस स्टेशन हद्दीतील खंडणी, खंडणीसाठी अपहरण, गंभीर दुखापत, बेकायदेशीर जमाव जमवून दहशत माजविणा-या आाणि काही दिवसांपासून फरार असलेला आरोपी नामे अक्षय अंकुश माने वय २३ वर्षे रा. ६३८, घोरपडी पेठ ननावरे चौक, पुणे यास खंडणी विरोधी पथकाकडून सापळा रचून ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर आरोपी हा अब्दूल गनी खान, अक्षय नाईक, अक्रम नासीर पठाण या आपल्या साथिदारांसह खडक पोलीस स्टेशनच्या हद्दीत खंडणी व शरिराविरुध्दचे गुन्हे करुन सामान्य नागरीकांच्या संपत्ती बळकाविण्याचा प्रयत्न करीत होता. नुकताच एका महिलेचे घर बळकाविण्याच्या गुन्ह्यात वरील आरोपींना अटक करण्यात आली होती, परंतु अक्षय माने हा फरार होता. त्याचेवर खडक पोलीस स्टेशनकडील एकुण ०३ गुन्हे दाखल असून तो खंडणीसाठी अपहरण, खंडणी मागणे, त्यासाठी जबर दुखापत करणे अशा वरील तीनही गुन्ह्यात तो पाहिजे आरोपी होता. तो कान्हा हॉटेल खंडोबा मंदिराजवळ, कात्रज कोंढवा रोड, पुणे येथे येणार असल्याची गोपनिय माहिती खंडणी विरोधी पथकातील पोलीस नाईक किरण चोरगे यांना मिळाल्याने सदरची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव यांना कळवून सहा. पोलीस निरीक्षक सुनिल गवळी व स्टाफने त्याला ताब्यात घेवून पुढील तपासकामी खडक पोलीस स्टेशनचे ताब्यात दिले आहे. सदर आरोपीवर सहकारनगर, बिबवेवाडी व खडक पोलीस स्टेशनकडील लुटमार, घरफोडी,खुनाचा प्रयत्न व वाहनजाळपोळ असे गंभीर स्वरुपाचे एकुण ०८ गुन्हे दाखल आहेत.

**सदरची कारवाई ही मा. प्रदीप देशपांडे अपर पोलीस आयुक्त सो, गुन्हे, पुणे., मा. पंकज डहाणे पोलीस उप-आयुक्त सो,गुन्हे पुणे व मा.सुरेश भोसले सहा.पोलीस आयुक्त सो,गुन्हे - १ पुणे यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, सहा. पोलीस निरीक्षक सुनील गवळी, विठ्ठल शेलार व स्टाफ , सचिन अहिवळे,किरण चोरगे, प्रशांत पवार, धीरज भोर,मंगेश पवार,हनुमंत गायकवाड, निलेश देसाई यांनी केली आहे.**